आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२१ डिसेंबर २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विधीमंडळाचं हिवाळी अधिवेशन संस्थगित, अर्थसंकल्पीय अधिवेशन ३ मार्चपासून

- मंत्रिमंडळाचं खातेवाटप लवकरच जाहीर करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आश्वासन

- मार्चपर्यंत राज्याला नक्षलवादमुक्त करण्याचा मानस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून व्यक्त

**आणि**

- हिवाळी अधिवेशनात विदर्भ आणि मराठवाड्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी कोणतीच चर्चा झाली नसल्याचा विरोधकांचा आरोप

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं नागपूर इथलं हिवाळी अधिवेशन आज संस्थगित झालं. ३ मार्च २०२५ पासून विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अधिवेशनाच्या कामकाजाचा आढावा आज सभागृहासमोर मांडला.

१६ डिसेंबर रोजी सुरू झालेल्या हिवाळी अधिवेशनात **विधानसभेच्या** एकूण सहा बैठका झाल्या. यात ४६ तास २६ मिनिटं कामकाज झालं असं विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. अधिवेशन कालावधीत १३ विधेयकं संमत तर १५ विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली. अधिवेशनासाठी विधानसभा सदस्यांची उपस्थिती ७२ पूर्णांक ९० शतांश टक्के इतकी होती. १५व्या विधानसभेत ७३ सदस्य पहिल्यांदाच निवडून आले आहेत, असं विधानसभा अध्यक्षांनी सांगितलं.

विधानपरिषदेच्या ६ बैठका झाल्या. यात ३६ तास कामकाज झालं, असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं. विधानपरिषदेत चार विधेयकं संमत झाली, तर चार विधेयकं पुनर्स्थापित करण्यात आली. चार विधेयकं शिफारशीशिवाय विधानसभेकडे परत

पाठवण्यात आली तसंच एक विधेयक संयुक्त समितीकडे पाठवल्याचं सभापतींनी सांगितलं. विधानपरिषदेत सदस्यांची उपस्थिती ७९ पूर्णांक ३० शतांश टक्के इतकी होती.

<><><><><>

महायुतीच्या सरकारनं जी कामं गेल्या अडीच वर्षांपूर्वी हाती घेतली त्याला गती देऊन राज्याला विकासाच्या दिशेनं नेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे, ते आज अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना बोलत होते.

विदर्भ आणि मराठवाड्यातल्या मागास आणि दुष्काळी भागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अनेक प्रकल्प राबवले जात आहेत, विदर्भात वैनगंगा - पैनगंगा - नळगंगा नदीजोड प्रकल्पाला मंजुरी देऊन दुष्काळी भागातली जमीन ओलिताखाली आणली जात आहे, बळीराजा योजनेअंतर्गत मराठवाडा आणि विदर्भातले ११० सिंचन प्रकल्प मंजूर केले असून ६९ प्रकल्प पूर्ण झाले आहेत अशी माहिती त्यांनी दिली.

अमरावतीत टेक्सटाइल पार्क मध्ये केंद्राकडून मिळणाऱ्या गुंतवणूकीतून दोन लाख नवे रोजगार मिळतील, संत्र्यासाठी क्लस्टर उभं राहील, जालन्यात ड्राय पोर्ट उभं राहील, लातूर मध्ये रेल कोच फॅक्टरीत वंदे भारत गाडीची निर्मिती केली जाईल असं त्यांनी सांगितलं. राज्यात शेतकऱ्यांसाठी मध्यप्रदेशच्या धर्तीवर कायमस्वरूपी खरेदी व्यवस्था उभी करणार असल्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

<><><><><>

राज्याला प्रगत आणि समृद्ध करण्यासाठी महायुतीचं सरकार अहोरात्र काम करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली. ते आज विधानपरिषदेत अंतिम आठवडा प्रस्तावावरच्या चर्चेला उत्तर देताना बोलत होते.

**होल्ड एकनाथ शिंदे**

महायुतीच्या काळात गुन्हे उघडकीला येण्याचे प्रमाण वाढले, विकास आणि कल्याणकारी योजनांना वेग मिळाला, विदर्भ आणि मराठवाड्यासारख्या औद्योगिकदृष्ट्या मागास भागांमध्ये उद्योग, रोजगार आणि सिंचनाच्या सुविधा वाढल्या असं ते म्हणाले.

मुंबईत दादर इथं इंदूमील मधल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचं काम ६ डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन असेल, असं त्यांनी सांगितलं.

मार्च २०२५ पर्यत नक्षलवादाचे समुळ उच्चाटन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. गडचिरोलीसारख्या भागात विविध प्रकल्प आले, रोजगार आले त्यामुळे या भागापर्यंत विकास पोहोचला, परिणामी येथील जनतेची मानसिकता बदलली ते मूळ प्रवाहात आले, असं शिंदे यांनी सांगितलं. राज्यात सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी प्रादेशिक समतोल राखत सिंचन क्षेत्र वाढवलं जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मंत्रिमंडळाचं खातेवाटप लवकरच जाहीर करणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपूर इथं हिवाळी अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर बातमीदारांशी बोलत होते. निवडणुकीनंतरचं हे अधिवेशन केवळ पुरवणी मागण्यांसाठी असतानाही, या अधिवेशनात शहरी नक्षलवाद आणि नक्षल संघटनांबाबतचं एक विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवलं आणि त्याशिवाय इतर सतरा विधेयकं मंजूर केल्याचं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्री लाडकी योजना, बळीराजा योजना अशा योजना पुढे सुरूच ठेवण्यासाठी या पुरवणी मागण्या मध्ये तरतूद केली असल्याची माहिती त्यांनी दिली.

**होल्ड बाईट - फडणवीस......**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे देखील यावेळी उपस्थित होते. महायुतीचं सरकार कापूस आणि सोयाबीनला हेक्टरी ५ हजार रुपये मदत देणार असल्याची माहिती त्यांनी दिली. शेतकऱ्यांना धानासाठी २० हजार रुपयांचा बोनस द्यायचा निर्णय या अधिवेशनात घेतला गेला असं त्यांनी सांगितलं. या अधिवेशनात जे मुद्दे सभागृहात मांडायला हवे होते ते विरोधकांनी मांडले नाहीत अशी टीकाही त्यांनी केली.

**<><><><><>**

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक दोन्ही सभागृहांच्या एकवीस सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पाठवण्यात आलं. चंद्रशेखर बावनकुळे हे या समितीचे अध्यक्ष असतील.

<><><><><>

विदर्भ,मराठवाड्याच्या जनतेला न्याय देण्यासाठी हिवाळी अधिवेशनात चर्चा होणं अपेक्षित होतं पण अशी कोणतीच चर्चा झाली नाही. भाजपा युती सरकारने शेतकरी कर्जमाफीचं आश्वासन देऊनही कर्जमाफीची घोषणा केली नाही, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर महाविकास आघाडीनं घेतलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पोलीस आणि बीडच्या गुंडाला सरकारचं अभय असल्याचं सांगत या बीड आणि परभणी दोन्ही प्रकरणांत सरकारनं बोटचेपी भूमिका घेतल्याचा आरोप त्यांनी केला. पुरवणी मागण्या फक्त खर्चासाठी आहेत, विकासासाठी निधीची तरतूद नाही, अशी टीका विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी सोमवारी परभणी दौऱ्यावर येणार असून सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबियाची भेट घेणार असल्याची माहिती पटोले यांनी दिली.

<><><><><>

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृतींना वंदन करुन प्रेरणा आणि नवी उर्जा मिळते. दिक्षाभूमीला आल्यानंतर नेहमीच वेगळी अनुभूती व समाधानही मिळते, अशा भावना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज व्यक्त केल्या. शिवसेनेच्या आमदारांसह शिंदे यांनी सकाळी दीक्षाभुमीला भेट दिली.

<><><><><>

बीडमधल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात जे कुणी दोषी आढळतील त्यांना फाशीची शिक्षा दिली जाईल, या प्रकरणातल्या मुख्य सूत्रधारालाही सोडणार नाही, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. त्यांनी आज मस्साजोग इथं जाऊन देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांचं सांत्वन केलं. या प्रकरणाची सखोल चौकशी राज्य सरकार करणार आहे. या प्रकरणाच्या मुळाशी जाऊ, असंही पवार यांनी सांगितलं.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला जे कुणी जबाबदार असतील, त्यांना तातडीनं धडा शिकवण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे. त्यांनी आज मस्साजोग गावाला भेट दिली आणि देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचं सांत्वन केलं. हे प्रकरण अतिशय गंभीर असून त्याची नोंद राज्य आणि केंद्र सरकारला घ्यावीच लागेल, असं शरद पवार म्हणाले.

<><><><><>

परभणीतल्या हिंसाचाराच्या निषेधार्थ आज आंबेडकरी संघटनांच्या वतीने पुकारण्यात आलेल्या जालना बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शहरातल्या मुख्य बाजारातली बहुतांश व्यापारी प्रतिष्ठाने दिवसभर बंद राहिली.

<><><><><>

मुंबईत ३ दिवसांपूर्वी झालेल्या बोट अपघातातल्या मृतांची संख्या १५ झाली आहे. या दुर्घटनेत बेपत्ता असलेल्या एका सात वर्षांच्या मुलाचा मृतदेह आज दुपारी बचाव पथकाला सापडला.

<><><><><>

अन्न औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आज बुलडाणा जिल्ह्यातल्या लोणार इथल्या औषध विक्रेत्याकडून २४ लाख रुपयांहून अधिक किंमतीचा अवैध औषध साठा जप्त केला.

<><><><><>

नाशिक जिल्ह्यातल्या सह्याद्री फार्म्स या कंपनीमध्ये युरोप आणि अमेरिकेतल्या कंपन्यांनी ३९० कोटी रूपयांची गुंतवणूक केली आहे. या गुंतवणुकीचा वापर पेटंट घेतलेली द्राक्षे आणि लिंबूवर्गीय फळांचे लागवड क्षेत्र विस्तारण्यासाठी आणि मूल्यवर्धित उत्पादनांच्या निर्मितीसाठी करण्यात येणार आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग आणि कोल्हापूरच्या सीमेवर असलेल्या ऐतिहासिक रांगणा गडावर हुल्लडबाज पर्यटकांना रोखण्यासाठी ३१ डिसेंबरला ग्रामस्थांकडून पहारा दिला जाणार

आहे. नववर्षानिमित्त गडावर मद्यपार्ट्या होऊ नयेत, किल्ल्याचं पावित्र्य राखलं जावं हा यामागील उद्देश आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा तसंच विदर्भातलं हवामान कोरडं राहणार असल्याचा हवामान खात्याचा अंदाज आहे.

गेल्या २४ तासात मराठवाड्यासह विदर्भातल्या तापमानात लक्षणीय  तर मध्य महाराष्ट्र तसंच  कोकणातल्या तापमानात किंचित वाढ झाली आहे.

//<><><><><>//